# जनावरांची अवैध वाहतूक करणारी ३ वाहने जप्त

पुण्यनगरी दि. 20/06/2023

## ६ लाख ५२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त; ६ आरोपींना अटक

**कुंडलवाडी / प्रतिनिधी**

शहरापासून जवळच असलेल्या माकणी गावाजवळील मांजरा नदीच्या पुलाजवळ जनावरांची अवैध वाहतूक करणारी ३ वाहने कुंडलवाडी पोलिसांनी दि.२० जून रोजी दुपारी १ च्या सुमारास पकडले. यात ६ लाख ५२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करीत याप्रकरणी ६ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

कुंडलवाडी शहर व परिसरात गत काही दिवसांपासून जनावरांची अवैध वाहतूक होत होती. यातच ५ जून रोजी शेळगाव रोडवर जनावरांची अवैध वाहतूक करणारी वाहने पकडण्यात आले होते. यानंतर २० जून रोजी दुपारी १ च्या सुमारास नागणी गावाजवळील मांजरा नदीच्या पुलाजवळ जनावरांची अवैध वाहतूक करणारे एमएच २६ ए डी ७४५९, एपी २५ डब्यु ०४९८ व एम एच २६ डीई २५६१ या ३ वाहनांमधून ८ गोरे असा एकूण ६ लाख ५२ हजार रुपयांचा मुद्देमाल कुंडलवाडी पोलिसांनी जप्त केला आहे. याप्रकरणी अतिक वहिद खुरेशी रा. मुतन्याळ, मोहम्मद मुसेब अब्दुल रशीदसाब रा. अहेमदपुरा निजामाबाद, मोहम्मद हुसैन जलील हुसैन रा.सालमपाड ता.बोधन, मोहम्मद कासीम मोहम्मद जलील रा.रकासपेठ,बोधन, आत्माराम शेषराव जाधव रा.बडूर,शेख जबार फकीरसाब रा.मेदनकल्लुर,देगलूर या ६ आरोपींविरुद्ध गु.र.नं. ७७/२०२३ कलम २७९, ३४ महाराष्ट्र प्राणी संरक्षण सुधारणा अधिनियम १९९५ सह कलमान्वये सहाय्यक पोलीस निरीक्षक विश्वजीत कासले यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल केला. ६ आरोपींनाही कुंडलवाडी पोलिसांनी अटक केली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोहेकाँ पी. आर.मेडेवार करीत आहेत.